# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मसुदा जाहीर सूचना

सार्वजनिक उद्दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या इमारती अनुज्ञा व अनुज्ञप्ती तत्त्वावर परिरक्षण व व्यवस्थापना करिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणांस सुधार समिती ठराव क्र. १७२ दि.२०.०२.२०२० व महानगरपालिका ठराव क्र. १५९ दि.२४.११.२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या बांधीव इमारती या विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठी जसे की, शिवणकामाचे प्रशिक्षण, अंतर्गत खेळ, प्रौढ शिक्षण अभियान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, सांस्कृतिक, शैक्षणिक, स्त्री व मुलांचे संगोपनाचे कार्यक्रम, कल्याणकेंद्र, योगाभ्यासकेंद्र, विपश्यना केंद्र, कुटुंब कलहातील समुपदेशन, सामाजिक उद्दिष्टे इत्यादीकरिता वितरीत करता येतील. या अनुषंगाने खालील समाजकल्याण केंद्र शैक्षणिक संस्थेस वितरित करावयाचे आहे. त्यानुसार संस्थांनी अर्ज सादर करावेत.

| **जागेचा तपशील** | **बांधीव सुविधेचा तपशील** |
| --- | --- |
| माहुलगाव येथील समाज कल्याण केंद्र, इमारत क्र. 64, CTS no. 2/1A, 2/1B, 2/4A, 2/4B, 2/4C, 2/5, 2/7A, 2/7B of Village Mahul, Chembur in M/W ward. | Area: 2240 sq.m.<br>संपूर्ण इमारत G+5 |

1. अर्ज करणारी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० या दोन्ही अधिनियमानुसार मागील ५ वर्षापासून (अर्ज मागविण्याच्या दिनांकापूर्वी) नोंदणीकृत असावी. अथवा कंपनी कायद्यानुसार सदर कंपनी नोंदणीकृत असावी.
2. समाजकल्याण केंदाचे वाटप शैक्षणिक केंद्र म्हणून करण्यात येणार असल्याने अर्जदार संस्थेकडे शैक्षणिक कार्यक्षेत्रातील कमीत-कमी ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासंदर्भात कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करणे.
3. संस्थेची मागील तीन वर्षाच्या कालावधीतील किमान वार्षिक उलाढाल रुपये दहा लाख असावी. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या ५०% पेक्षा कमी नसावी. मागील तीन वर्षाच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद अर्जासोबत सादर करावा लागेल.
4. संस्थेच्या नावे स्वतंत्र पॅन क्रमांक (आयकराचा स्थायी खाते क्रमांक) असावा.

5. संस्था आयकर प्रपत्र सादर करणारी / करदाती असावी आणि मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यात यावे.
6. अर्जासोबत इसारा रक्कम रु.१५,०००/- रोखीत किंवा पे ऑर्डर डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात महापालिकेस भरणा करण्यात यावी.
7. पात्र संस्थेस प्रथमत: ११ महिन्यांकरिता अनुज्ञा व अनुमती तत्वावर रु ५/- प्रति चौ. फूट प्रति महिना या दराने अनुज्ञप्ती शुल्क आकरण्यात येईल. सदर अनुज्ञप्ती शुल्कात दरवर्षी ५ टक्के वाढ करण्यात येईल.
8. पात्र संस्थेस दोन वर्षाच्या अनुज्ञप्ती शुल्काइतकी रक्कम व्याज विरहीत सुरक्षा ठेव म्हणुन महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.
9. सदर समाजकल्याण केंद्राच्या वाटपाकरिता धोरण क्र. MCT/3081/dtd. 15.12.2020 व सआ/मालमत्ता/२२४०/मक्ता-५ दि. ०६.०९.२०२३ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

समाजकल्याण केंद्राचे वाटप "संस्था" या उद्दिष्टपूर्तीकरिता करण्यात येत असल्याने व शैक्षणिक कार्य करणा-या संस्थेस समाजकल्याण केंद्राचे वाटप करावयाचे असल्याने निवडीदरम्यान मुल्यमापन करतांना फक्त वरील बाबीचा प्राधान्याने विचार केला जाईल संस्थांनी वरील बाबी संदर्भातील कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करावे.

सुलभ संदर्भाकरिता समाजकल्याण केंद्रांच्या वाटपाच्या धोरणाची प्रत महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

समाजकल्याण केंद्राचे वाटप करताना शैक्षणिक संस्थेमार्फत चालविले जाणारे महाविद्यालय हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असल्याने या क्षेत्रात कार्य करणा-या संस्थांनी समाजकल्याण केंद्र वाटपाच्या मंजुर धोरणातील पात्रतेच्या निकषानुसार लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. २४/०४/२०२६ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयामध्ये सादर करावेत. विहीत मुदती नंतर सादर केल्या जाणा-या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

श्री. हरीश कोराते,
सहाय्यक अभियंता (सुधार-२),
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,
म.न.पा. मुख्य कार्यालय, चौथा मजला,
महापालिका मार्ग, सीएसटी, मुंबई- ४०० ००१.
Tel. (०२२) २२६२०५१ (Ext. ४४२३)
Email id-ac.estates@mcgm.gov.in

सही /-

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**